# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १४१-२२** **दिनांक :- १६/०५/२०२२**

## एका ११ वर्षाच्या बालिकेचे अपहरण करुन लैंगिक अत्याचार करण्याऱ्या नराधमास १२ तासाच्या आत अटक.

दिनांक १५/०५/२०२२ रोजी रात्री ०१.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी यांनी वसई पोलीस ठाणे येथे येवून फिर्याद दिली की त्यांची ११ वर्षाची अल्पवयीन मुलगी ही सायंकाळी १६.०० वाजताच्या सुमारास खेळायला जाते असे सांगून घरातुन निघुन गेली ती घरी परत आली नाही. त्यामुळे तीचे कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण करुन घेवून गेलेबाबत तक्रार दिली होती. त्यावरुन वसई पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.सं.कलम ३६३, ३७६ (अ),(ब) सह बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधि. कलम ४ व ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभिर्य लक्षात घेवून सदर मुलीचा शोध घेतला असता अपहृत मुलगी दि. १५/०५/२०२२ रोजी रात्रौ ०३.३० वाजताचे सुमारास मिळून आल्याने तिस महिला पोलीस अंमलदाराचे मदतीने विश्वासात घेवून विचारपूस केली असता समजुन आले की, एका अनोळखी इसमाने तिचे वसई स्टेशन येथून अपहरण करुन तेथून एका ठिकाणी घेवून जावून तिचेसोबत लैंगिक अत्याचार केलेबाबत माहिती प्राप्त झाली. सदरची बाब वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना कळविले असता त्यांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ ४ पथके तयार करण्यात आली होती. सदर पिडीत मुलीने सांगीतल्याप्रमाणे वसई पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सर्व घटनास्थळाचे बारकाईने पाहणी करुन व तांत्रिक कौशल्याचा वापर करुन जलदगतीने तपास केला आरोपीत नामे आरिफ अय्युब शेख यास १२ तासाच्या आत दि. १५/०५/२०२२ रोजी १९.०० वाजता ताब्यात घेवून सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री. प्रदिप गिरीधर, सहा.पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे, श्री. ऋषिकेश पवळ, पोलीस निरिक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सुनिल पवार, सपोनि/राम सुरवसे, पोउपनिरी/विष्णु वाघमोडे, मपोउपनिरी/वृषाली थिटे, पोहवा सुनिल मलावकर, पोअं. बाळु गर्जे, अमोल पाटील, भालेराव यांनी केलेली आहे.

----000----